# नाशिक महानगरपालिका, नाशिक
## कर आकारणी विभाग
## जाहीर लिलाव नोटीस

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियामातील कलम १२८ व कलम ४९६ चे परिशिष्ट २(३) व अनुसुची “ड” प्रकरण ८ (कराधान नियम) नियम ४२,४५ व ४७ अन्वये मालमत्ता करांची थकबाकी वसुलीसाठी.)

नाशिक महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारक/वहिवाटदार/भोगवटदार यांना जाहिर लिलावा नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमुद केलेले वहिवाटदार/मिळकतधारक यांना कायदेशिर मुदत देऊनही सन २०२४-२०२५ अखेरी मालमत्ता थकबाकी भरलेली नाही. त्यांची स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. त्या स्थावर मालमत्ता जसे आहे, जेथे आहे त्या प्रकारे जाहिर लिलावाने विक्रीकरुन थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांचा जाहिर लिलाव ज्या-त्या विभागीय कार्यालयातील प्रभाग समिती मिटींग हॉल मध्ये करण्यात येईल. ज्या कोणास सदरहु लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी वेळेवर समक्ष हजर रहावे. लिलाव अटी व शर्ती, लिलाव डिपॉझिट इ.संबंधी माहिती लिलाव सुरु होण्यापुर्वी दिली जाईल. लिलावातील मिळकतींची माहिती सुट्टयांचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत विभागीय कार्यालयात मिळेल.

**विभागीय कार्यालयाचे नांव : नविन नाशिक वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा. दि. ०२/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४३१०२७४० | सचदेव इंदसिंग रामसिंग (हॉटेल कशिष पॅलेस) | चेतना नगर, नाशिक शिवार | आर.सी.सी. | १२२८८२/- + शास्ती |
| २ | ४३१०५३७७ | टकले प्रदिप अरविंद/ दुर्गा अपार्टमेंट | चेतना नगर, नाशिक शिवार | आर.सी.सी. | १६२१३२/- + शास्ती |
| ३ | ४३११७१७८ | कृष्णा स्पेसेस पार्टनरशिप फर्म/ अटलांटा शॉपर्स | पाथर्डी फाटा, पाथर्डी शिवार | आर.सी.सी. | १५३९४८/- + शास्ती |
| ४ | ४३११७२५५ | कृष्णा स्पेसेस पार्टनरशिप फर्म/ अटलांटा शॉपर्स | पाथर्डी फाटा, पाथर्डी शिवार | आर.सी.सी. | २१८५५८/- + शास्ती |
| ५ | ४३१०४२९२ | मुळाणे देविदास तात्या/ गणेश हाईटस | चेतना नगर, नाशिक शिवार | आर.सी.सी. | १४४२७१/- + शास्ती |
| ६ | ४०५०००६९ | अभंग जगन देविदास | सिडको, नाशिक | आर.सी.सी. | ४१३२७/- + शास्ती |
| ७ | ४०६०३११० | इंडियन ऑयल कॉर्पोरेशन | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | २०५१६९/- + शास्ती |
| ८ | ४११००५८१ | शेख बाबु फत्तु | सिडको, नाशिक | आर.सी.सी. | ४०८९५/- + शास्ती |
| ९ | ४०६०१५२३ | पठाण बाबु अकबर | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | ३७२४९/- + शास्ती |
| १० | ४०६०६००३ | पाटील संगिता भगवान | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | ६२२४७/- + शास्ती |
| ११ | ४०६०६००८ | केदार पोपट स्वरुपचंद | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | ६०९८१/- + शास्ती |
| १२ | ४०६०४६४७ | मलानी सरला भागचंद | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | ६४९४७/- + शास्ती |
| १३ | ४०६०४६४६ | मलानी जयश्री सुभाष | उंटवाडी, नाशिक शिवार | आर.सी.सी. | ६४९४७/- + शास्ती |
| १४ | ४०५०३२५८ | मराठे दिलीप लक्ष्मण | सिडको, नाशिक | आर.सी.सी. | ३५०८८/- + शास्ती |
| १५ | ४०५०२०३७ | तिडके सिध्दार्थ | सिडको, नाशिक | आर.सी.सी. | ३०९१७/- + शास्ती |
| १६ | ४०५०२३४४ | पठारे लक्ष्मण श्रवण | सिडको, नाशिक | आर.सी.सी. | ४११११/- + शास्ती |
| १७ | ४३१०६९३८ | वसंत मार्केटिंग/ ज्युपिटर हॉटेल | पाथर्डी फाटा, नाशिक शिवार | आर.सी.सी. | १३२४७७०/- + शास्ती |
| १८ | ४३११०११७ | सुभाष बुधाजी बारोतकर/ पाम हॉटेल | पाथर्डी फाटा, पाथर्डी शिवार | आर.सी.सी. | ९५१४३६/- + शास्ती |

**विभागीय कार्यालयाचे नांव : सातपूर वेळ : दुपारी १२.०० ते दुपारी १.३० वा. दि. ०२/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| १९ | १०२०२३६८ | तिडके एकनाथ लक्ष्मण | अंबड लिंकरोड, तिडके पेट्रोल पंपाजवळ, सातपुर, नाशिक | आर.सी.सी. | ११४८४५/- + शास्ती |
| २० | १०३०१३७० | श्रेयस उद्योग | ए-२७, सातपुर एम.आय.डी.सी. नाशिक | आर.सी.सी. | १११८५४४/- + शास्ती |
| २१ | १०३००८६६ | विडाम मशिन प्रा.लि. | ९९/४, सातपुर एम.आय.डी.सी. नाशिक | आर.सी.सी. | ४१५५४६५/- + शास्ती |
| २२ | १०३००२२९ | पवार इलेक्ट्रोसिस्टम् प्रा.लि. | सातपुर एम.आय.डी.सी. नाशिक | आर.सी.सी. | १३८२३६०/- + शास्ती |
| २३ | १०४०४८४० | एन.जे.गिरणा सहकारी बँक लि.नाशिक | ४८९/१, रामजी कॉम्प्लेक्स् , अशोकनगररोड, सावरकर नगर, सातपुर | आर.सी.सी. | १३६४३७/- + शास्ती |
| २४ | १०४०५७१४ | आदिनाथ अपार्टमेंट, बेसमेंट, सातपुर | ५१६/५/२२, २, आदिनाथ अपार्टमेंट, बेसमेंट, सातपुर | आर.सी.सी. | ६२९१७९/- + शास्ती |
| २५ | १०५१३३८२ | वाधवा सुलोचना सुरेंद्र | आनंदवली ५६/१, १५ रिवेरा, बेंडकुळे नगर, आनंदवली, गंगापुररोड | आर.सी.सी. | १२२१५०/- + शास्ती |
| २६ | १०५१३३७७ | होळकर प्रतिभा एम. ॲन्ड् होळकर मुकुंद सिताराम | आनंदवली ५६/१, १५ रिवेरा, बेंडकुळे नगर, आनंदवली, गंगापुररोड | आर.सी.सी. | १६४६७९/- + शास्ती |
| २७ | १०७०८२३९ | खान जावेद एहसानुल्लाह | १५/२अ, ३१, अंबड लिंकरोड, महाराष्ट्र ट्रेडर्स जवळ, चुंचाळे शिवार, सातपुर, नाशिक | पत्राशेड | १८९१७३/- + शास्ती |

**विभागीय कार्यालयाचे नांव : ना.पूर्व वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा. दि. ०३/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| २८ | ८२६०१६३६ | कोकणी गुलामगौस जाउददीन | जेएमसीटी कॉलेज समोर, वडाळारोड, इंदिरानगर, नाशिक | ब्रिक्स्, | ८८१९३४/- + शास्ती |
| २९ | ८२६००९८९ | कोकणी गुलामख्वाजा गुलामगौस व इतर-४ | जेएमसीटी कॉलेज समोर, वडाळारोड, इंदिरानगर, नाशिक | ब्रिक्स्, | १५९७११/- + शास्ती |
| ३० | ८०९०३६५३ | जसपालसिंग रेखी +१ पार्टनर, सी.एयु. | मिरजकर कॉम्प्लेक्स्, व्दारका पेट्रोलपंप, नाशिक | आर.सी.सी. | १८५९०१८/-+ शास्ती |
| ३१ | ८०९००५७६ | सैय्यद बनेमियाँ कासम व इतर-२ | इमाम शाही,कोळीवाडा, पेट्रोल पंपाजवळ,सारडा सर्कल, नाशिक | पेट्रोल पंप | ११०६३९७/- + शास्ती |

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | ८०९०००० ३ | मोहंम्द इलियास मोहम्म्द सलिम | जोगवाडा जुने नाशिक | आर.सी.सी. | ११७२१६६/-+ शास्ती |
| ३३ | ८१४००४०१ | श्रीम.खैरुनिसा हनिफ सैय्यद् | पांढरीमाता मंदिर शेजारी ,२१३/१ ऑनरोड राजवाडा, वडाळागांव | ब्रिक्स्, | ४१७९४५/-+ शास्ती |
| ३४ | ८२३०८२२३ | उरेश ,तानाजी , शिवाजी एल.सहाने | इच्छामनी लॉन्स् , उपनगर, नाशिक | ब्रिक्स् आर.सी.सी | १४७९४९४/-+ शास्ती |
| ३५ | ८२३०६५५७ | राठोड उर्मिला रमेशचंद्र् व इतर -१ | खोडदे नगर रो-हाउस, उपनगर, गांधीनगर | आर.सी.सी.पत्राशेड | १३०४६७/- + शास्ती |
| ३६ | ८२३०६५५८ | पवार मुकुंद अनंतराव | २३/३१, खोडदे नगर रो-हाउस, उपनगर, गांधीनगर | आर.सी.सी. | १०२१४४/-+ शास्ती |
| ३७ | ८११०६३०८ | नायर राजन कन्न | निवृत्ती कॉम्प्लेक्स् व्दारका, नाशिक | आर.सी.सी. | ७४८७८४/-+ शास्ती |

**विभागीय कार्यालयाचे नांव : ना. पश्चिम वेळ : दुपारी १२.०० ते दुपारी १.३० वा. दि. ०३/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | ७३११०३८२ | अर्हम बिल्डर्सप्रा.लि. | ७७६/१/३/-१+२ चोपडा लॉन्स जवळ, गंगापुर नाशिक | आर सी सी | ६१२३१८६/- + शास्ती |
| ३९ | ७०२०९४९९ | अनिल बिल्डर्स | सुशिल हाईट्स, पारिजात नगर सिग्नल जवळ नाशिक | आरसीसी | ११७८३२५/-+ शास्ती |
| ४० | ७३११०४३० | वसुंधरा प्रापर्टी वसुंधरा अशोक तलवारे | ६७७/०८/०१/०४-४०४ जुना गंगापुर नाका, प्रमोद महाजन गार्डन जवळ, गंगापुररोड नाशिक | आरसीसी | ९००७२५/- + शास्ती |
| ४१ | ७०७१०८७९ | अभिलाषा मार्केटींग प्रा.लि. व इतर २ | ७५०+७५१+७५५/२-१, लव्हाटेनगर, त्रंबकरोड, नाशिक | ओपन प्लॉट | ७२८६२१/- + शास्ती |
| ४२ | ७०२१०९०१ | जितेंद्रजनार्दन बेलगावकर,जनार्दन विठ्ठल बेलगावकर व पराग जनार्दन बेलगावकर | ७१२/२अ+२ड-६७+६८, ऑर्कीड प्लाझा, गंगापुररोड,जितेंद्र वर्ल्ड, डिसुजा कॉलनी नाशिक | आर सी सी | ६०५१०३/- + शास्ती |
| ४३ | ७०७०५५६३ | हाटेक प्रोजेक्ट | प्रेसीडन्सी कॉम्पलेक्स, जनलक्ष्मी बँकेजवळ, जुना, आग्रारोड, नाशिक | आर सी सी | ५७०७३८/- + शास्ती |
| ४४ | ७०४०८५२१ | अग्रवाल उमेश दुर्गाप्रसाद व इतर | कमल दुर्गा बिल्डींग, रुंग्ठा शाळेजवळ, अशोकस्तंभ, नाशिक | आरसीसी +ब्रिक+शेड | ४९७२०१/- + शास्ती |
| ४५ | ७०७०५५६२ | परदेशी सी.आर. | प्रेसीडन्सी कॉम्पलेक्स, जनलक्ष्मी बँकेजवळ, जुना, आग्रारोड, नाशिक | आर सी सी | ४७८६५९/- + शास्ती |

**विभागीय कार्यालयाचे नांव : पंचवटी विभाग वेळ : सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा. दि. ०४/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| ४६ | ३०३०४२९९ | घटमपाल अनिल किसनचंद | नाशिक कृषी उत्पन्न् बाजार समिती | आर.सी.सी | ९३३९९३९/- + शास्ती |
| ४७ | ३०३०६५७७ | कर्नावत महाविर दगडुलाल | टाउन स्केअर पेठरोड पंचवटी | आर.सी.सी | ६२८८१/- + शास्ती |
| ४८ | ३०५००५१९ | सेवाकुंज ट्रस्ट् | जुना आग्रारोड पंचवटी नाशिक | आर.सी.सी | ६९११३०६/- + शास्ती |
| ४९ | ३०९०१७९९ | चौघुले हिरामण महादुअप्पा | चौघुले गोठा पेठरोड, मखमलाबाद नाशिक | लोखंडी पत्रे,लोडबेअरींग | २६५२३९/- + शास्ती |
| ५० | ३१००२९५९ | निकम भोलेश्वर वामन | पुरुषोत्तम् सहकारी सोसा. आडगांव,पंचवटीनाशिक | आर.सी.सी | ७४४३७/- + शास्ती |
| ५१ | ३१००८७९२ | महाले रावसाहेब रामराव | सुकमल प्लाझा, धात्रक फाटा, आडगाव | आर.सी.सी | १००४७४/- + शास्ती |
| ५२ | ३१५०९८१६ | भालेराव रामदास काशीनाथ | औदुंबर नगर, मुंबई आग्रारोड, पंचवटी | आर.सी.सी | २४२७२६/- + शास्ती |
| ५३ | ३१५०९८१६ | भालेराव रामदास काशीनाथ | औदुंबर नगर, मुंबई आग्रारोड, पंचवटी | आर.सी.सी | २४२७२६/- + शास्ती |
| ५४ | ३१९०३००२ | शिंदे भास्कर् रंगनाथ व इतर | कोल्ड् स्टोरेज, तवली फाटा, पेठरोड, मखमलाबाद, पंचवटी | ब्रिक्स्, (वीटा, सिमेंट, पत्रे ) | १८४८३९/- + शास्ती |
| ५५ | ३०१०३७४७ | बत्तासे रंजना अंबादास + बत्तासे अंबादास दत्तात्रय | दालवाला आर्केड पंचवटी कारंजा, नाशिक | आर.सी.सी | ९२०६८/- + शास्ती |
| ५६ | ३०१०२९४१ | गोसावी निर्मला उदयपुरी + ३ | सितागुफा शेजारी, पंचवटी | आर.सी.सी | ९९१०२३/- + शास्ती |
| ५७ | ३०१०३७०० | गोसावी निर्मला उदयपुरी + ३ | सितागुफा शेजारी, पंचवटी | आर.सी.सी | ६८९५३/- + शास्ती |
| ५९ | ३१३०४५१४ | कुलकर्णी पी. जी. | मखमलाबाद नाका, पंचवटी | ओपन प्लॉट | १२८६७३२/- + शास्ती |
| ६० | ३१३०५४६२ | कान्हे रतनकुमार अॅण्ड कंपनी | गाळा नं. ५४, शरद पवार मार्केट यार्ड, पेठरोड, नाशिक | आर.सी.सी | १९३१७६/- + शास्ती |
| ६१ | ३१३००५२८ | पगारे काशिनाथ लक्ष्मण | नवनाथनगर, पंचवटी | विट | १००४५७/- + शास्ती |
| ६२ | ३०४०१२७७ | चाफेकर सरस्वतीबाई काशिनाथ | चिंचबन, पंचवटी विभागीय कार्यालयाचे मागे, पंचवटी | आर.सी.सी | १०४३७२/- + शास्ती |
| ६३ | ३०४०१२७८ | चाफेकर किशोर काशिनाथ | चिंचबन, पंचवटी विभागीय कार्यालयाचे मागे, पंचवटी | आर.सी.सी | ८१५५२/- + शास्ती |

**विभागीय कार्यालयाचे नांव : नाशिकरोड विभाग वेळ : दुपारी १२.०० ते दुपारी १.३० वा. दि. ०४/०७/२०२५**

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| ६४ | ६१५०६७९० | राहुल सुधाकर कुटे व इतर एक | स्टार प्लस बिल्डींग ,विर सावरकर,एम.जी. रोड, ना.रोड | आर.सी.सी | ३०५३१५१/- + शास्ती |

| अ क्र. | इंडेक्स क्रमांक. | मिळकतधारकाचे नांव | मिळकतीचा पत्ता | मिळकतीचे वर्णन | थकबाकी (र.रु) |
|---|---|---|---|---|---|
| ६५ | ६१५०६८२३ | व्ही.के.आर.जी. हेल्थकेअर प्रा. लि.डायरेक्टर गडसिंग प्रविण नारायण व इतर दोन | स्टार प्लस बिल्डींग,विर सावरकर,एम.जी.रोड, ना.रोड. | आर.सी.सी | ११०८१६७/- + शास्ती |
| ६६ | ६०८००७९१ | बेबी फ्रेंड हॉस्पिटल (पारख एस.आर. व तीन) | सिटी सेंटर इमारत, जुना कलानगर, जेलरोड, ना.रोड | आर.सी.सी | ९२२१२९/- + शास्ती |
| ६७ | ६०६०३७०८ | भालेराव एस.एस. | भालेराव मळा, जयभवानी रोड, ना.रोड | ब्रिक्स्, | ७४७०२४/- + शास्ती |
| ६८ | ६०५०९०६२ | सारडा जयश्री सुरेश | ईश्वर प्राईड, विद्या विहार कॉलनी, ना.रोड | आर.सी. सी | ६५५३४९/- + शास्ती |
| ६९ | ६३२०९७०५ | लोखंडे तानाजी काशीनाथ | खर्जुल मळा, तिरुपती नगर, टाकळी रोड, जेलरोड, ना.रोड | पत्राशेड | २३१६७५/- + शास्ती |
| ७० | ६०१०३२८२ | थावरानी प्रेम ताराचंद | फ्लॅट नं.१६, मातृ छाया अपार्टमेंट, सौभग्य नगर,ना.रोड | आर.सी.सी | २०४१९५/- + शास्ती |
| ७१ | ६१३०२४८२ | ठक्कर पुरुषोत्तम ज.मु. धारक कारडा नरेश जे. | ऑफीस नं.२१२, के.बी.एन. मार्केट, सुभाष रोड,ना.रोड | आर.सी.सी | १९८६३०/- + शास्ती |
| ७२ | ६०५०५३०४ | धोंगडे एन.एन. व इतर तीन | राजलक्ष्मी मंगल कार्यालय, धोंगडे नगर, दत्त मंदीर ,ना.रोड | आर.सी.सी | ४८४१२२/- + शास्ती |
| ७३ | ६०८००८५७ | साधवानी श्रीराम भगतराम व एक | बि.एम.एस.सुपर मार्केट,कलानगर, जेलरोड,ना.रोड | आर.सी.सी | ५७४८६५/- + शास्ती |

लिलावात कोणीही भाग घेतला नाही तर, नाममात्र बोली बोलुन स्थावर मालमत्ता खरेदी/कब्जा घेण्याचा अगर तहकुब करणेचा अधिकार महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे. तसेच तमाम जनतेस कळविणेत येते की, वर नमुद केलेल्या स्थावर मालमत्तासंबंधी कोणत्याही व्यक्तीने गहाण, दान, ताबे गहाण अगर अन्य मार्गाने कोणतेही व्यवहार केल्यास ते बेकायदेशिर ठरतील. तसेच ज्या वित्त संस्थांनी व अन्य संस्थांनी गहाण, दान, ताबेगहाण, हस्तांतरण अगर व्यवहार केला असल्यास, नाशिक मनपाचे कर भरण्याची जबाबदारी संबंधितांवर राहील. सदरची यादी मनपाचे www.nmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर नोटीस खर्च र.रु. २०००/- (अक्षरी र.रु. दोन हजार मात्र) संबंधीत मिळकतधारकांचे मालमत्ता डिमांड रजिस्टरी नोंद घेऊन वसुल करणेत येईल.

XXX
(अजित निकत)
उपआयुक्त (कर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

नाशिक महानगरपालिका, नाशिक

कर आकारणी विभाग

जाहिर लिलावाने करावयाच्या मालमत्ता विक्रीच्या अटी व शर्ती

१. लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रु २५०००/- (अक्षरी रक्कम रुपये पंचवीस हजार मात्र) रोखीने भरतांना महापालिकेस पॅनकार्ड व आधार कार्ड छायाकित प्रत्त देणे आवश्यक आहे.

2. लिलावात भाग घेण्यासाठी ज्या इसमाने अनामत रक्कम भरली असेल, त्यांनाच लिलावामध्ये भाग घेता येईल. अनामत रक्कम भरणा-याच्या वतीने इतरांना भाग घेता येणार नाही.

3. लिलावात नमुद केलेल्या मालमत्तेची प्रत्यक्ष पहाणी करुनच लिलावात भाग घ्यावा. मालमत्तेची पहाणी केली नाही, अशी तक्रार नंतर विचारात घेतली जाणार नाही.

४. ज्याचे नांव त्तीन वार करुन लिलाव मंजूर करण्यात येईल, त्याने ताबडतोब लिलावा जागी २५ टक्के रक्कम भरली पाहिजे व नंतर उरलेली रक्कम पंधरा दिवसांत महानगरपालिकेच्या कार्यालयात भरली पाहिजे.

५. वरील शर्त क्रमांक ४ नुसार लिलाव बोलणा-याने रक्कमेचा भरणा न केल्यास महानगरपालिकेचे होणारे सर्व नुकसान लिलाव बोलणा-याकडून वसूल करण्यांत येईल.

६. लिलावात बोलणी केलेल्या बोलीच्या रक्कमेपैकी शिल्लक राहीलेली रक्कम उक्त मुदतीत भरणा न केल्यास लिलावामध्ये भाग घेण्यासाठी भरलेली अनामत रक्कम व भरणा केलेली २५ टक्के रक्कम जप्त करण्यात येईल. बोलीधारकास जप्त केलेल्या रक्कमेवर अथवा मिळकतीचे विक्री केलेल्या रक्कमेच्या कोणत्याही भागावर हक्क राहणार नाही. अशा मिळकती परत विक्रीसाठी काढण्यात येवून तिची विक्री केली जाईल आणि पूर्वीच्या बोलीधारकास पुन्हा लिलावात भाग घेता येणार नाही.

७. महानगरपालिकेस येणे असलेल्या रक्कमेच्या संबंधी व लिलावात काढलेल्या मिळकती संबंधीची माहिती संबंधित विभागीय कार्यालय व कर आकारणी (मुख्यालय) विभाग येथे रविवारी व सुट्टीचे दिवसाखेरीज इतर कामाचे दिवशी दुपारी 3.00 ते ५.00 वाजेपर्यंत मिळेल.

८. लिलाव घेणा-यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व त्याखाली तयार केलेले सर्व नियम व उपविधी. आवश्यक त्या फेरबदलासह लागू राहतील.

९. विक्रीच्या घोषणा पत्रकात नमूद केलेल्या येणे रक्कमे व्यतिरिक्त अधिनियमातील तरतूदीनुसार प्रसिध्दीचा खर्च वसूल केला जाईल.

१०. जर ठरवून दिलेल्या दिवशी व वेळी संबंधित मिळकत विकत घेण्यास अगर बोली बोलण्यास कोणीही आले नाही, तर नियम ४७ (७) अन्वये सदरची मिळकत नाशिक महानगरपालिका स्थायी समितीच्या पूर्व मंजूरीने नाममात्र किंमतीस ताब्यात घेणेत येईल.

११. नागरी जमीन कमाल मर्यादा व नियंत्रण अधिनियम १९७६ व त्या खालील नियमांच्या सर्व तरतुदी खरेदीदारांवर बंधनकारक राहतील. संबंधीत अधिनियमानुसार विक्रीस आवश्यक ती मंजुरी मिळाल्यावर विक्री प्रमाणपत्र देण्यात येईल व तशी मंजुरी मिळणेसाठी खरेदीदारास जरुर ते सर्व कागदपत्र, खात्रीपत्रके, कागदोपत्री पुरावे व माहिती संबंधीत अधिका-यास सादर करावी लागेल.

१२. लिलाव करावयाच्या मालमत्तेचे निश्चित केलेली आधारभूत किंमतीपेक्षा (अपसेट व्हॅल्यू) कमी रक्कमेची बोली लागल्यास सदर मालमत्ता विक्री केली जाणार नाही. व फेर विक्री संबंधी नविन जाहिर लिलाव नोटीस प्रसिध्द करणेत येईल.

१३. लिलाव मंजूर झाल्यानंतर भरावयाची रक्कम व त्याबाबतचा आयकर, संपत्तीकर, रजिस्ट्रेशन चार्जेस, स्थानिक संस्था कर, स्टॅम्प डयूटी संबंधीत सर्व खर्च खरेदीदारास करावे लागतील याबाबत नाशिक महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

१४. लिलावामध्ये भाग घेणा-यापैकी ज्यांच्या बोलीस मान्यता दिली जाईल त्याची अनामत रक्कम वगळता इतरांची अनामत रक्कम त्याच दिवशी परतावा करण्यांत येईल.

१५. लिलावामध्ये मंजूर झालेली बोलीची सर्व रक्कम भरणा केल्यानंतरच नमूद गालगतेचा हक्कदार म्हणून त्या इसमास मान्यता दिली जाईल.

१६. उक्त मालमत्तेवर इतर काही बोजा असल्यास किंवा सरकारी दप्तरी काही चादविवाद असल्यास नाशिक महापालिका त्यास जबाबदार राहणार नाही. त्याचे निवारण लिलावधारकाने करावयाचे आहे.

१७. लिलावामध्ये असलेली मिळकत, त्या कसूरदाराने किंवा त्यांच्या वतीने कोणी दुस-या व्यक्तीने थकबाकी थी रक्कम लिलावापुर्वी केव्हाही अदा केल्यास, व सदरची थकबाकी भरल्याबाबतची पावती वा प्रमाणपत्र उपआयुक्त (कर)/संबंधित विभागीय अधिकारी यांच्याकडे सादर केल्यास सदर मालमत्तेची विक्री तहकूब करणेत येईल.

१८. कसूरदाराना रक्कम उभी करण्यासाठी गहाण वगैरे ठेवून संधी देण्यासाठी विक्री लांबणीवर टाकणे बाबत.

अ. स्थावर मालमत्ता विक्री काढण्याचा लिलाव काढल्यानंतर जर कसूरदाराने ती किंवा इतर मालमत्ता गहाणवट टाकून भाड्याने देवून किंवा अशा मालमत्तेची किंवा त्यातील काही भागाची विक्री करुन किंवा इतर मालमत्तेची विक्री करुन पैसा उभा करणार असल्याबाबत मा. आयुक्तांची खात्री पटवून दिली व तशा प्रकारे अर्ज दिल्यास त्याची सत्यता / पडताळणी करुन मा. आयुक्त कसूरदाराला पैसे उभे करण्यासाठी अशा मालमत्तेची विक्री काही कालावधी करीता स्थगित ठेवू शकतील. यासाठी अटी व शर्ती विहीत करण्यास मा. आयुक्त सक्षम असतील.

ब. अशा प्रकरणात मा. आयुक्त कसूरदाराला नियोजित गहाणवट, भुईभाडे पोटी किंवा मालमत्तेची विक्री करुन वगैरे बाबतीत लेखी परवानगी देतील व येणे असलेली रक्कम विहित मुदतीच्या आत भरणा करण्यास परवानगी देतील. अशा प्रकारे करण्यात आलेली गहाणवट विक्री वा भाड्याने देण्याचे कृत्य या स्थायी आदेशान्वये जो पर्यंत मा. आयुक्त त्यास परवानगी देणार नाहीत तो पर्यंत हा व्यवहार अंतिम झाला असे समजण्यास येणार नाही.

१९. लिलावामध्ये भाग घेणा-या इसमाकडून आवश्यक ती रक्कम बोली मधून उभी राहत नसल्यास, अथवा इतर कोणत्याही कारणास्तव सदर लिलाव तहकूब करणे, पूढे ढकलणे, फेर लिलाव करणे याबाबत सर्व अधिकार व हक्क निम्न स्वाक्षरीकारांकडे असतील.

२०. मिळकतीचा जाहिर लिलाव पुर्ण झाल्यानंतर मुळ मालकाने १५ दिवसांचे आंत विक्री केलेल्या मिळकतीची मालमत्ता कराचा, जाहिर लिलावाच्या दिनांकापर्यंत असलेली थकबाकी एक रकमी पुर्ण भरणा केल्यास दर मिळकतीचा लिलाव रद्द होईल व लिलावात भाग घेणाऱ्या इसमास अनामत पोटी घेतलेली रक्कम परत केली जाईल. तसेच लिलावातील बोली रकमेच्या ५ टक्के रक्कम मिळकतधारक / भोगवटादार यांनी मनपा खजिन्यात भरणा करणे बंधनकारक राहील.

२१. लिलावात बोली बोलणाऱ्या इमाकडून लिलाव बोली रक्कम १५ दिवसाचे मात्र मुळ मालकास भाग घेणा-या इसमाकडून आवश्यक ती रक्कम बोली मधून उभी राहत नसल्यास, अथवा इतर कोणत्याही कारणास्तव सदर लिलाव तहकूब करणे, पूढे ढकलणे, फेर लिलाव करणे याबाबत सर्व अधिकार व हक्क निम्न स्वाक्षरीकारांकडे असतील.

२२. जेव्हा लिलाव व विक्री पूर्ण होईल तेव्हा अशा विक्रीपासून मिळालेल्या रक्कमेतून प्रथम विक्रीसाठी झालेली खर्चाची रक्कम व त्यानंतर थकबाकीची रक्कम वळती करुन उर्वरित थकबाकीदाराचे नावे नाशिक महानगरपालिकेच्या फंडामध्ये जमा करण्यात येईल.

२३. विक्री संबंधी या आदेशात वा इतरत्र उवधुत न केलेल्या जाहीर लिलावाच्या पुर्वी किंवा नंतर वापरण्याच्या कार्यपध्दतीत संबंधीच्या अटी मा. आयुक्त विहित करु शकतील, अशा अटी या स्थायी आदेशाचा भाग समजण्यात येतील.

२४. कोणतेही कारण न देता सदरचा जाहिर लिलाव रद्द करणे अथवा लांबणीवर टाकणेचे अधिकार मा.आयुक्त अथवा विक्री करण्यास प्राधिकृत केलेले अधिकारी यांना राखून ठेवणेत येत आहे.

ठिकाण :- १.नविन नाशिक विभागीय कार्यालय
२. सातपुर विभागीय कार्यालय
३. नाशिक पुर्व विभागीय कार्यालय
४. नाशिक पश्चिम विभागीय कार्यालय
५. पंचवटी विभागीय कार्यालय
६. नाशिकरोड विभागीय कार्यालय

Sd/xxx
(अजित निकत)
उपआयुक्त (कर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक